2. In compliance with the circular electronic copies of the notice of the AGM and Annual Report for Financial Year 2025-26 have been sent to all the shareholders whose email IDs are registered with the Company/Register and Transfer Agents (RTA)/Depository Participant (DP) on July 2, 2026.
3. A letter providing the web link and the QR code for accessing the annual report for FY 2025-2026 was dispatched on July 3, 2026 to those shareholders who have not registered their email IDs with the Company/ RTA/DP.
4. Shareholders holding shares either in physical mode or in dematerialized mode as on the cut off date i.e August 5, 2026 may cast their vote electronically on the business as set both in the notice of the AGM to the electronic voting system of the NSDL (remote E-voting). The voting right of the shareholders shall be proportionate to the equity shares held by them in the paid up equity share capital of the Company. Members attending the AGM through VC / OAVM shall be counted for the purpose of reckoning the quorum under Section 103 of the Companies Act, 2013.
5. All the shareholders are informed that
   i. The cut off date for determining the eligibility to vote by remote E-voting or by E-voting system at the AGM shall be August 5, 2026
   i. The remote E-voting shall commence on Sunday, August 9, 2026 (9.00 a.m. (IST)) and end on Tuesday, August 11, 2026 (5.00 p.m. (IST))
   ii. Any person holding shares in physical form and non individual shareholders who acquire shares of the company and become a shareholder of the company after the notice of the AGM is being sent and holding shares as on the cut off date that is August 5, 2026 may obtain the login ID and password by sending a request at evoting @nsdl.com/. However if he /she is already registered with NSDL for e-voting then he/she can use his/her existing user ID and password for casting the vote.
6. Shareholders may note that
   i. Once the Shareholder casts the vote on a resolution, the Shareholder shall not be allowed to change its subsequently.
   i. The facility for voting will also be made available during the AGM , and those Shareholder present in the AGM through VC facility, who have not cast their vote on the resolution through remote e-voting and are otherwise not barred from doing so, shall be eligible to vote through the e-voting system during the AGM.
   ii. The Shareholder who have not cast their vote by remote e-voting prior to the AGM may also attend the AGM but shall not be entitled to cast their vote again.
   iv. Only persons whose name is recorded in the register of shareholders or in the register of beneficial owners maintained by the depositories as on the cut off date shall be entitled to avail the facility of remote e-voting or e-voting at the AGM.
7. Shareholders who are holding shares in demat mode and have not updated their KYC details are requested to register the email ID and other KYC details through their depository participants. Shareholders who are holding shares in physical mode and have not updated their KYC details are requested to submit Form ISR 1 and other KYC details with the Company/ RTA, MUFG Intime India Private Limited (Formerly Link Intime India Private Limited).
8. For the process and manner of e-voting, Members may refer to the instructions in the Notice of 4th AGM and to the Frequently Asked Questions (FAQs) and e-voting user manual available at https://www.evoting.nsdl.com.
9. The Annual Report of the Company along with the Notice is available on the website of the Company at www.forbesprecision.co.in/ website of BSE Limited at www.bseindia.com and on the website NSDL at www.evoting.nsdl.com

**Forbes Precision Tools and Machine Parts Limited**
**Sd/-**
**Rupa Khanna**
**Company Secretary & Compliance Officer**

**Mumbai, July 3, 2026**

---

Bombay Dyeing

## THE BOMBAY DYEING AND MANUFACTURING COMPANY LIMITED

(CIN: L17120MH1879PLC000037)
Registered Office: Neville House, J. N. Heredia Marg, Ballard Estate, Mumbai - 400001
E-mail: grievance_redressal_cell@bombaydyeing.com; Phone: (91) (22) 66620000
Website: www.bombaydyeing.com

**NOTICE TO THE MEMBERS REGARDING 146TH ANNUAL GENERAL MEETING**

Notice is hereby given that the 146th Annual General Meeting of ("AGM"/ "Meeting") of the Members of The Bombay Dyeing and Manufacturing Company Limited ("the Company") will be held on **Friday, 7th August, 2026 at 11:30 A.M. (IST)** through **Video Conferencing ("VC")/Other Audio Visual Means ("OAVM")** to transact the businesses as set out in the Notice of the 146th AGM in compliance with the applicable provisions of the Companies Act, 2013, Rules made thereunder and the Securities and Exchange Board of India (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015 ("SEBI Listing Regulations").

The Ministry of Corporate Affairs ("MCA") has vide its Circular No. 14/2020 dated 8th April, 2020 read with Circular No. 17/2020 dated 13th April, 2020, Circular No. 20/2020 dated 5th May, 2020, Circular No. 02/2021 dated 13th January, 2021, Circular No. 19/2021 dated 8th December, 2021, Circular No. 02/2022 dated 5th May, 2022, Circular No. 10/2022 dated 28th December, 2022, Circular No. 09/2023 dated 25th September, 2023, Circular No. 09/2024 dated 19th September, 2024 and latest being Circular No. 03/2025 dated 22nd September, 2025 (hereinafter collectively referred to as "MCA Circulars") permitted the holding of the AGM through VC or OAVM, without the physical presence of the Members at a common venue.

In compliance with the aforesaid Circulars and the relevant provisions of the Companies Act, 2013 and the SEBI Listing Regulations, the 146th AGM of the Members of the Company will be held through VC/OAVM and Notice of the AGM along with the Annual Report for FY 2025-26 will be sent by electronic mode to those Members whose e-mail addresses are registered with the Company/RTA/ Depositories/Depository Participant(s) and a letter will be sent by the Company providing the web-link, including the exact path where complete details of the Annual Report (including Notice of AGM) is available, to those shareholder(s) who have not registered their e-mail addresses with the Company/RTA/ Depositories/ Depository Participant(s). The Company shall also send the physical copy of the Annual Report (including the Notice of AGM) to those Members who request for the same at grievance_redressal_cell@bombaydyeing.com.

Members may note that the Notice of the AGM and Annual Report for FY 2025-26 will also be available on the Company's website at www.bombaydyeing.com and on the websites of the Stock Exchanges i.e. BSE Limited and National Stock Exchange of India Limited at www.bseindia.com and www.nseindia.com respectively, and also on the website of NSDL at www.evoting.nsdl.com. Members can attend and participate in the AGM through VC/OAVM facility only. The instructions for joining the AGM are provided in the Notice of the AGM. Members attending the Meeting through VC/OAVM shall be counted for the purpose of reckoning the quorum under Section 103 of the Companies Act, 2013.

Members may note that the Board of Directors of the Company, at its meeting held on 8th May, 2026, has recommended a dividend of Rs. 0.40 (20%) per Equity share of face value of Rs. 2/- each for the financial year ended 31st March, 2026. The Dividend, if declared at the ensuing AGM, will be paid, subject to deduction of tax at source after Friday, 7th August, 2026, to those shareholders holding shares as on Friday, 31st July, 2026 ("cut-off date").

Notice is hereby further given that pursuant to the provisions of Section 91 of the Companies Act, 2013, the Register of the Members and Share Transfer Books of the Company will remain closed from Saturday, 1st August, 2026 to Friday, 7th August, 2026 (both days inclusive) for the purpose of AGM and determining the entitlement of the shareholders for the final dividend for the financial year 2025-26.

The Company is providing remote e-voting facility ("remote e-voting") and e-voting facility during the AGM to all its Members to cast their votes on all resolutions set out in the Notice of the AGM. Detailed procedure for remote e-voting/e-voting is provided in the Notice of the AGM.

Pursuant to applicable SEBI Circulars, with effect from 1st April, 2024, dividend to shareholders holding shares in physical form shall be paid by the Company only through electronic mode. Such payments shall be made to eligible shareholders only after they have furnished their PAN, contact details (postal address with PIN and Mobile Number), Bank Account Details, and Specimen Signatures for their corresponding physical folios with the Company / RTA.

If your e-mail address is not registered with the Depositories (if the shares are held in electronic form)/ Company (if the shares are held in physical form), you may register to receive the Notice of the AGM along with the Annual Report for FY 2025-26, by completing the process as mentioned hereunder:

| | |
|---|---|
| Demat Holding | Please contact your Depository Participant(s) (DP) and register your e-mail address as per the process advised by your DP. |
| Physical Holding | Send a request in the prescribed form ISR-1 duly filled to M/s. KFin Technologies Limited, Registrar and Share Transfer Agent of the Company ("KFin") at **einward.ris@kfintech.com** providing Folio No., Name of Shareholder, scanned copy of the Share Certificate (front and back) and self-attested scanned copy of PAN card and self-attested copy of any of the following document viz. Aadhar Card/Driving License/Election Identity Card/Passport for registering e-mail address. Members may download the form ISR-1 which is available on website of the Company viz. https://bombaydyeing.com/forms.html |

Pursuant to the Income Tax Act, 2025 ("the Act"), dividend paid or distributed by a Company shall be taxable in the hands of the shareholders. The Company shall, therefore, be required to deduct tax at source ("TDS") from dividend paid to the shareholders at prescribed rates for various categories. Shareholders are requested to submit documents in accordance with the provisions of the Act on or before 31st July, 2026. The detailed process of the same is available on the website of the Company at https://bombaydyeing.com/investor_updates.html

For **The Bombay Dyeing and Manufacturing Company Limited**
**Sd/-**
**Sanjive Arora**
**Company Secretary**

Place: Mumbai
Date: 3rd July, 2026

# ‘रामरक्षा' आंदोलन म्हणजे नौटंकीच; राजकीय धर्मांतर झालेल्यांनी हिंदुत्वावर बोलू नये

## मंत्री नितेश राणे यांचा उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल

**मुंबई, दि. ३ : विशेष प्रतिनिधी**

राम मंदिराच्या देणगी निधीवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपवर केलेल्या आरोपांनंतर राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या पार्श्वभूमीवर राज्याचे मत्स्यव्यवसाय आणि बंदरे विकासमंत्री नितेश राणे यांनी उद्धव ठाकरेंवर अत्यंत आक्रमक शब्दांत पलटवार करत, ‘‘राजकीय धर्मांतर झालेल्यांनी हिंदू धर्म आणि हिंदुत्वावर बोलण्याचा नैतिक अधिकार गमावला आहे,’’ असा हल्लाबोल केला.

विधान भवन परिसरात माध्यमांशी बोलताना राणे म्हणाले की, ‘‘राम मंदिराच्या नावावर ‘रामरक्षा’ आंदोलनाची



नौटंकी करणाऱ्या उद्धव ठाकरेंचा प्रभू श्रीराम आणि हिंदू धर्माशी आता काहीही संबंध राहिलेला नाही.’’

राणे यांनी उद्धव ठाकरेंच्या मुख्यमंत्री पदाच्या कार्यकाळावरही निशाणा साधत, ‘कोरोना’च्या काळात हिंदूंचे सण, मंदिरे आणि महाआरतींवर निर्बंध घालणारे; पण ‘अझान’ आणि इतर धार्मिक कार्यक्रमांवर मौन बाळगणारे आता मंदिरांमध्ये जाऊन हिंदुत्वाचा आव आणत आहेत, अशी टीका केली.

२०१९ मध्ये भाजपशी युती तोडून सत्ता स्थापन करणाऱ्या ठाकरे यांच्यावर त्यांनी निशाणा साधत, ‘ऑपरेशन भाजप’ राबवून पाठीत खंजीर खुपसणाऱ्यांनी आता हिंदुत्व आणि मराठी अस्मितेच्या गप्पा मारू नयेत, असे ते म्हणाले.

संजय राऊत यांच्या वक्तव्यावरही राणे यांनी टीका केली. त्यांना कोणी गांभीर्याने घेत नाही, असा टोला राणे यांनी लगावला.

दरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत अयोध्येला जाण्याबाबत उद्धव ठाकरे यांनी केलेल्या वक्तव्यावर उत्तर देताना राणे म्हणाले की, ‘‘उद्या उद्धव ठाकरे माझ्यासोबत मंदिरात यायला तयार असतील, तर मी स्वतः त्यांना घेऊन जाईन.’’

### आमच्या मनातून राम काढणे अशक्य!

राम मंदिराच्या मुद्द्यावरून भाजपला लक्ष्य करणाऱ्या ठाकरे यांच्या भूमिकेवर प्रतिक्रिया देताना राणे म्हणाले की, ‘‘राम मंदिर आमच्यासाठी निवडणुकीचा विषय नाही, तर श्रद्धा आणि अस्मितेचा विषय आहे. भाजपच्या जन्मापूर्वीपासून आम्ही हिंदू आहोत. आमच्या मनातून राम काढणे अशक्य आहे.’’

# मुख्याध्यापकांचा निरोप समारंभ

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

‘महात्मा फुले शिक्षण संस्थे’द्वारे चालवल्या जाणाऱ्या धारावी येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाच्या माध्यमिक विभागाचे (मराठी, हिंदी आणि उर्दू माध्यम) मुख्याध्यापक काकासाहेब काशीद यांचा निरोप समारंभ शाळेच्या आवारात नुकताच पार पडला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष, माजी आमदार बाबूराव माने आणि संस्थेचे सचिव दिलीप शिंदे यांनी त्यांना शाल आणि फुलांचा गुच्छ देऊन सन्मानित केले. त्यांनी काशीद यांच्या अध्यापन कारकिर्दीचा आणि मुख्याध्यापक म्हणून त्यांच्या कार्यकाळाचा आढावा घेत त्यांच्या समर्पणाची प्रशंसा केली. काशीद यांच्या मृदुभाषी आणि शिस्तप्रिय स्वभावामुळे शाळेतील सर्व माध्यमांतील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांच्या निरोप समारंभात उत्साहाने सहभाग घेतला. शाळेत कार्यरत असलेल्या सर्व स्वयंसेवी संस्थांच्या सदस्यांनीही या निरोप समारंभात सक्रियपणे सहभाग घेतला.

ठाणे महानगरपालिका व राज्याभिषेक समारोह संस्था, ठाणे आयोजित
दि. ५ जुलै २०२६ रोजी ३५३ शिवराज्याभिषेक निमित्ताने भव्य
‘श्री राज्याभिषेक दिन महोत्सव’
।।श्वासात राजं ध्यासात राजं।।
(स्वराज्य वीरांची अमर गाथा!)
लेखन, दिग्दर्शन - दिग्पाल लांजेकर
निर्मिती - पौर्णिमा मनोहर
कलाकार -
दिग्पाल लांजेकर
मृणाल कुलकर्णी
अजय पुरकर
अवधुत गांधी






सांस्कृतिक कार्यक्रम
❋ पोवाडा ❋ सेक्सोफोन वादन ❋ नृत्याविष्कार ❋ चरित्र दर्शन प्रदर्शनी
● प्रवेश विनामूल्य ● काही जागा राखीव
दि. ५ जुलै २०२६, दुपारी ४.३० वाजल्यापासून
शिवराज्याभिषेक दिन सोहळा
स्थळ : गडकरी रंगायतन, ठाणे
कार्यक्रमासाठी संपर्क 9004824494/9420468846 8976142226/9821513263

CAPACIT'E
कॅपेसिट इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड
नोंद. कार्यालयः ६०५-६०७, श्रीकांत चेंबर्स, फेज-१, ६ वा मजला, आर. के. स्टुडियोच्या जवळ, सायन-तुर्भे रस्ता, मुंबई - ४०००७१. CIN: L45400MH2012PLC234318
दूरध्वनीः +९१ (२२) ७१७३ ३७१७; फॅक्सः +९१ ७१७३ ३७३३;
ईमेलः cs@capacite.in; वेबसाईटः www.capacite.in

सूचना
कंपनीच्या समभागांचे गुंतवणूकदार प्रशिक्षण आणि संरक्षण निधी (आयईपीएफ)मध्ये हस्तांतरण

आयईपीएफ प्राधिकरण (लेखांकन, लेखापरिक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियमन, २०१६ सह वाचावयाच्या कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १२४(६) च्या तरतुदींच्या अनुषंगाने, याद्वारे **कॅपेसिट इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड** (“कंपनी”)च्या भागधारकांना सूचना देण्यात येते की, वित्तीय वर्ष २०१८-१९ पासून सुरु होणाऱ्या सात (७) किंवा जास्त लागोपाठच्या वर्षांकरिता प्रदान न करता किंवा दावा न करता राहिलेली, प्रदान न केलेली किंवा दावा न केलेली लाभांश रक्कम, आणि सुसंगत इक्विटी समभाग आयईपीएफ मध्ये हस्तांतरण करण्यात येतील.

**भागधारकांना सूचना**

कंपनीने ज्यांचे लाभांश वित्तीय वर्ष २०१८-१९ पासून सुरु होणाऱ्या सात लागोपाठच्या वर्षांकरिता प्रदान न करता किंवा दावा न करता राहिले आहेत, अशा संबंधित भागधारकांना, समभाग आयईपीएफला हस्तांतरित होणे टाळण्याकरिता त्यावर दि. ०४ ऑक्टोबर, २०२६ रोजी किंवा त्यापूर्वी दावा करण्याची विनंती करणारे वैयक्तिक संप्रेषण आधीच पाठविले आहेत.

अशा भागधारकांचा फोलियो क्रमांक /डीपी आयडी आणि क्लायंट आयडी, भाग संख्या आणि **(दि. ०४.१०.२०२६)** रोजी किंवा त्यापूर्वी आयईपीएफ प्राधिकरणास हस्तांतरित होण्यास पात्र असलेली लाभांश रक्कम समाविष्ट असलेला तपशील कंपनीची वेबसाईट www.capacite.in/shareholders-information/ वर उपलब्ध आहे.

**भागधारकांकडून आवश्यक कृती**

संबंधित भागधारकांना विनंती करण्यात येते की, त्यांनी **दि. ०४.१०.२०२६** रोजी किंवा त्यापूर्वी कंपनी निबंधक आणि हस्तांतरण एजन्ट (“आरटीए”) कडे अर्ज करून त्यांचे प्रदान न केलेले/दावा न केलेले लाभांश आणि / किंवा समभागांवर ताबडतोब दावा करण्याची विनंती आहे असे न केल्यास कंपनी पुढील कृती करेल

- भौतिक समभाग, जर असल्यास, **डिमटेरिअलाईज्ड** करण्यात येतील आणि
- लागू नियमनांच्या अनुपालनामध्ये समभाग आणि प्रदान न केलेले लाभांश आयईपीएफ प्राधिकरणास **हस्तांतरित** करण्यात येतील.

आयईपीएफला एकदा हस्तांतरित केल्यावर लाभांश आणि समभागांवरील इतर लाभ योग्य मालकाद्वारे दावा करेपर्यंत ते गोठविण्यात येतील. भागधारक त्यांच्या लाभांश आणि सुसंगत समभागांवर नियमांमध्ये विहीत प्रक्रियेचे पालन करून आणि आयईपीएफ वेबसाईट www.iepf.gov.in येथे उपलब्ध **फॉर्म आयईपीएफ-५** भरुन दावा करु शकतात.

कृपया नोंद घ्यावी की, आयईपीएफ प्राधिकरणास हस्तांतरित केलेल्या समभाग किंवा लाभांशांच्या संदर्भात कंपनीविरुद्ध कोणतेही दावे करता येणार नाहीत.

**पत्रव्यवहार आणि प्रश्न**

कोणतेही प्रश्न किंवा सहाय्याकरिता, भागधारक खालील पत्त्यांवर संपर्क साधू शकतातः

| | |
|---|---|
| **कॅपेसिट इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड**<br>**राहुल कपूर**<br>कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी<br>६०५-६०७, श्रीकांत चेंबर्स, फेज-१,<br>६ वा मजला, आर. के. स्टुडियोला संलग्न<br>सायन ट्रॉम्बे रोड, चेंबूर,<br>मुंबई - ४०००७१, महाराष्ट्र<br>दूर. क्र.: ०२२ ७१७३३७१७<br>ईमेलः cs@capacite.in | **निबंधक आणि हस्तांतरण एजन्ट**<br>**केफिन टेक्नोलॉजिस लिमिटेड**<br>३०१, दि सेंट्रियम, ३ रा मजला,<br>५७, लाल बहादूर शास्त्री मार्ग,<br>नव पाडा, कुर्ला (पश्चिम)<br>मुंबई - ४०००७०, महाराष्ट्र<br>टोल फ्री क्र.: 18003094001<br>ईमेलः einward.ris@kfintech.com |

कॅपेसिट इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड करिता
सही/-
राहुल कपूर
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

ठिकाणः मुंबई
दिनांकः ०३ जुलै, २०२६

# क्यूबेकसोबतच्या भागीदारीतून राज्यात मोठी गुंतवणूक होणार : देवेंद्र फडणवीस

## कॅनडातील क्यूबेक प्रांताच्या शिष्टमंडळाची मुख्यमंत्र्यांसमवेत भेट

**मुंबई, दि. ३ : विशेष प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान, क्वांटम कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, खाण संशोधन या क्षेत्रांमध्ये गुंतवणुकीच्या मोठ्या संधी असून, महाराष्ट्र क्यूबेकसोबत या क्षेत्रांसाठी भागीदारी करण्यास तयार आहे. या भागीदारीतून राज्यात निश्चितच मोठी गुंतवणूक येईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

कॅनडातील क्यूबेक प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहारमंत्री क्रिस्टोफर स्किट यांच्या नेतृत्वात शिष्टमंडळाने शुक्रवार, दि. ३ जुलै रोजी विधानभवन येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी शिष्टमंडळासमवेत झालेल्या चर्चेदरम्यान मुख्यमंत्री बोलत होते. याप्रसंगी राज्य शिष्टाचारमंत्री जयकुमार रावल उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ‘‘२०१८ मध्ये मॉन्ट्रियल येथे भेट दिली असता, त्यावेळी माहिती तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवीकरणीय ऊर्जा, जैव-तंत्रज्ञान, तसेच आदिवासी कल्याण या विषयांवर सामंजस्य करार करण्यात आले होते. हे करार महाराष्ट्र आणि क्यूबेकमधील संबंध अधिक दृढ असल्याचे प्रतीक आहे. तसेच नुकतेच कॅनडाचे पंतप्रधान मार्क कार्नी यांच्या नेतृत्वात आलेल्या उच्चस्तरीय शिष्टमंडळाशी मुंबईभेटीदरम्यान महाराष्ट्रातील गुंतवणुकीच्या संधीविषयी सकारात्मक चर्चा झाली होती.’’



### महाराष्ट्रात गुंतवणूक करण्यात रस : क्रिस्टोफर स्किट

क्यूबेक प्रांताचे आंतरराष्ट्रीय व्यवहारमंत्री क्रिस्टोफर स्किट म्हणाले की, ‘‘क्यूबेक कॅनडामध्ये प्रगत राज्य असून, कृत्रिम बुद्धिमत्ता, डेटा सेंटर, शिक्षण, क्रिटिकल मिनरल्स यामध्ये मोठी गुंतवणूक आहे. क्यूबेक महाराष्ट्रासोबत विविध क्षेत्रांमध्ये भागीदारी करण्यास तयार आहे. ‘पेन्शन फंड संस्थे’च्या माध्यमातून भारतामध्ये मोठी गुंतवणूक करण्यास क्यूबेकने तयारी केली आहे.’’ भागीदारीच्या माध्यमातून महाराष्ट्रात विविध क्षेत्रांमध्ये गुंतवणूक करण्यात रस असल्याचेही स्किट यांनी सांगितले.

# साकीनाका खैराणी रोडवरील सुरक्षा जाळी बसविण्याचे काम विनापरवानगी होते सुरू

## पालिकेच्या चौकशीत खुलासा

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

साकीनाका येथील खैराणी रोडवरील उघड्या ‘मॅनहोल’मध्ये पडून ५५ वर्षीय असलम शेख यांचा मृत्यू झाल्याच्या प्रकरणात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक चौकशीत गंभीर अनियमितता उघडकीस आली आहे. ज्या ठिकाणी ‘मॅनहोल’वर सुरक्षा जाळी बसविण्याचे काम सुरू होते, त्या कामासाठी कोणतीही अधिकृत ‘वर्क ऑर्डर’ जारी करण्यात आली नव्हती, असे चौकशीत समोर आले आहे.

महापालिका अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, सांडपाणीवाहिनीवरील ‘मॅनहोल’वर सुरक्षा जाळी बसविण्याच्या कामासाठी ना औपचारिक मंजुरी घेण्यात आली होती, ना संबंधित विभागाच्या कनिष्ठ अभियंत्याला किंवा मुकादमाला याची माहिती देण्यात आली होती. त्यामुळे काम सुरू होण्यापूर्वी किंवा सुरू असताना पालिकेकडून कोणतीही पाहणी अथवा देखरेख करण्यात आली नाही.

एका अधिकाऱ्याने सांगितले की, या कामाची माहिती विभागाला असती, तर संबंधित वॉर्ड कार्यालयाचे पथक घटनास्थळी पाठवून आवश्यक सुरक्षा उपायांचे पालन होत आहे की नाही, याची खात्री केली असती. संबंधित कंत्राटदाराशी संपर्क साधून याबाबत विचारणा करण्यात आली. मात्र, याबाबत समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

### दोन दिवसांत सात पालिका अधिकाऱ्यांचे निलंबन

गेल्या दोन दिवसांत मुंबईतील दोन वेगवेगळ्या दुर्घटनांप्रकरणी पालिकेने एकूण सात अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई केली आहे. चेंबूर येथे झाड कोसळून ११ वर्षीय मुलाचा मृत्यू झाल्यानंतर तीन अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आले. तर साकीनाका येथील ‘मॅनहोल’ दुर्घटनेत ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर संबंधित वॉर्ड अधिकाऱ्यासह चार अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली. अवघ्या दोन दिवसांत सात अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई होणे, ही मुंबई पालिकेच्या इतिहासातील अभूतपूर्व घटना मानली जात आहे.

# पूर्ण उत्तरपत्रिका लिहूनही २९ जणांना शून्य गुण

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या तीन वर्षांच्या ‘एलएलबी’ अंतिम वर्षाच्या निकालात संपूर्ण उत्तरपत्रिका लिहूनही तब्बल २९ विद्यार्थ्यांना शून्य गुण देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. पुनर्तपासणीनंतर हेच विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्याने उत्तरपत्रिका तपासणीतील गंभीर निष्काळजीपणा उघड झाला आहे. या प्रकरणावर आ. सत्यजित तांबे यांनी विद्यापीठ प्रशासनावर नाराजी व्यक्त करत बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कडक कारवाईची मागणी केली आहे. सत्यजित तांबे म्हणाले की, ‘‘विद्यार्थ्यांच्या उत्तरपत्रिका तपासा; त्यांच्या भविष्याची परीक्षा घेऊ नका. शून्य गुण द्यायचेच असतील, तर अशा निष्काळजी आणि ढिसाळ व्यवस्थेलाच द्या.

# धारावी कोळीवाड्याची हद्द कायम राहण्याची शक्यता

## सबळ पुराव्यांअभावी नव्याने सीमांकन करता येणार नसल्याची माहिती

**मुंबई, दि. ३ : विशेष प्रतिनिधी**

राज्य सरकारचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असलेल्या धारावी पुनर्विकास प्रकल्पामध्ये (डीआरपी) धारावी कोळीवाड्याचा समावेश करावा की नाही, या वादावर लवकरच पडदा पडण्याची शक्यता आहे. या प्रकरणात ठोस कागदोपत्री पुराव्यांची कमतरता असल्याने, प्रकल्पाची सध्याची भौगोलिक सीमारेषा बदलता येणार नसल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून देण्यात आली आहे.

या प्रकरणाशी संबंधित असलेल्या सूत्रांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, धारावी पुनर्विकास प्रकल्पातून कोळीवाड्याला वगळण्यासाठी करण्यात आलेल्या निवेदनांची आणि याबाबत नोंदविण्यात आलेल्या आक्षेपांची दखल संबंधित यंत्रणांकडून घेण्यात आली. मात्र, याबाबत पडताळणी करताना धारावी पुनर्विकास प्रकल्पाची निविदा आणि सरकारच्या अधिसूचनेत नमूद करण्यात आलेली प्रकल्पाची सध्याची भौगोलिक सीमारेषा अवैध ठरविण्याबाबत सबळ कागदोपत्री पुरावा उपलब्ध झाला नाही.



धारावी कोळीवाड्याच्या हद्दीचा वाद काही महिन्यांपूर्वी न्यायालयात गेला. कोळीवाड्याबाहेरील अतिरिक्त जागा पुनर्विकास प्रकल्पातून वगळण्याबाबत दाद मागण्यात आली होती. ‘कोळी जमात ट्रस्ट’च्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. कोळीवाड्यालगतची सुमारे २,००,८३० चौरस मीटर जागा धारावी पुनर्विकास प्रकल्पातून वगळण्याची मागणी या याचिकेत करण्यात आली होती. ही जागा पारंपरिक मासेमारी आणि संबंधित कामांसाठी वापरली जात असल्याचा दावा यावेळी करण्यात आला होता.

‘महाराष्ट्र लॅण्ड रेव्हेन्यू कोड १९६६’ अंतर्गत, मत्स्यव्यवसाय विभाग आणि सिटी सर्व्हे अधिकाऱ्यांकडून धारावी कोळीवाड्याच्या बाह्य सीमांकनाची प्रक्रिया अद्याप पूर्ण झाली नसल्याचेदेखील या याचिकेत नमूद करण्यात आले होते. ‘जीआरपी’, ‘बेस्ट’, ‘ओएनजीसी’, ‘एईएमएल’ आणि ‘म्हाडा’ या प्राधिकरणांच्या गृहनिर्माण संस्थांच्या इमारतींचा ताबा, ‘एसपीव्ही’ (विशेष हेतू प्रकल्प)कडे देण्याच्या निर्णयालादेखील या याचिकेत आव्हान देण्यात आले होते.

### न्यायालयाचे म्हणणे काय?

२०१६ मध्ये जारी करण्यात आलेल्या अधिसूचनेला जवळपास दहा वर्षे झाल्यावर प्रकल्पाच्या कामाला स्थगिती देण्याचा हा प्रयत्न कायदेशीरदृष्ट्या ग्राह्य धरता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. आधीच निकाली काढण्यात आलेल्या मुद्द्यांवर पुन्हा चर्चा सुरू झाल्यास त्याचा पुनर्विकास प्रकल्पाच्या अंमलबजावणीवर परिणाम होईल. पर्यायाने लाखो रहिवाशांचे आणि व्यावसायिकांचे भवितव्य धोक्यात येऊ शकेल, अशी शासनाची भूमिका असल्याचे सूत्रांनी सांगितले.

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

E-TENDER NOTICE

**Tender Specification No.** Civil-III/HO/Rfx No. 300069379 and 3000070103/FY-2026-27

**Name of work:**

1) Biennial general Pest control & Rodent control service MSPGCL office at 4th floor HDIL building Mumbai.

2) Biennial Maintenance & servicing of fans including rewinding of fans installed by MSPGCL and maintenance of regular electrical installations and equipments at Prakashgad, Dharavi and Hdil offices, residential quarters at Mumbai.

| | |
|---|---|
| **Sale period: -** 03.07.2026 at 11:00 Hrs. to 23.07.2026 up to 17:00 Hrs. | **Submission Date :-** 24.07.2026 up to 15:00 Hrs. |

Kindly see the company's website https://eprocurement.mahagenco.in. For detailed tender notice.

**Contact person-** Executive Engineer(C), O/o Chief Engineer (Civil) -III, M.S.P.G. Co. Ltd., Mumbai **Fax :**( 022)26581469 **Tel.No.**022-26474211 extn. 2590, 26472131

सिन्नर नगरपरिषद, सिन्नर (जि. नाशिक)

निविदा सूचना

सर्व नोंदणीकृत ठेकेदार यांना कळविण्यात येते की, सिन्नर नगरपरिषदेतील बांधकाम विभागाकडील मा. खासदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत सिन्नर नगरपरिषद हद्दीत एकूण दोन विकास कामासाठी ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सदरची ई-निविदा महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक ०४/०७/२०२६ सायं. ०६:०० पासून विहित मुदतीसाठी पाहण्यास व ऑनलाइन दाखल करण्यास सविस्तर अटी व शर्तीसह उपलब्ध राहील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **श्री. सौरभ गायकवाड**<br>नगर अभियंता<br>सिन्नर नगरपरिषद, सिन्नर | **श्री. अभिजित कदम**<br>मुख्याधिकारी<br>सिन्नर नगरपरिषद, सिन्नर | **श्री. उदय गोळेसर**<br>बांधकाम सभापती<br>सिन्नर नगरपरिषद, सिन्नर | **श्री. हर्षद देशमुख**<br>उपनगराध्यक्ष<br>सिन्नर नगरपरिषद, सिन्नर | **श्री. विठ्ठल राजे उगले**<br>नगराध्यक्ष<br>सिन्नर नगरपरिषद, सिन्नर |

# ‘स्टिंग’सारखी एनर्जी ड्रिंक्स लहान मुलांना घातक : विक्रम पाचपुते

**मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

**‘स्टिंग’सारखी एनर्जी ड्रिंक्स लहान मुलांच्या आरोग्यावर घातक परिणाम करीत आहेत. यावर पावसाळी अधिवेशनात भाजप आमदार विक्रम पाचपुते यांनी शुक्रवार, दि. ३ रोजी विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित करून लक्ष वेधले आणि त्याबाबतची बातचीत दै. ‘मुंबई तरुण भारत’चे मंत्रालय प्रतिनिधी अभिनंदन परुळेकर यांच्याशी केली.**

**■ आरोग्याविषयी आपण आज कोणता तारांकित प्रश्न उपस्थित केला?**

‘स्टिंग’ या एनर्जी पेयाविषयीचा माझा तारांकित प्रश्न होता. ‘स्टिंग’ पेयासारख्या विषयाकडे लक्ष वेधण्याचे कारण की, अलीकडच्या काळात ‘स्टिंग’सारख्या एनर्जी ड्रिंककडे लहान मुलांचा कल वाढतो आहे. पण, ‘स्टिंग’ एनर्जी ड्रिंकच्या लेबलवर लहान मुलांसाठी, गरोदर महिलांसाठी अयोग्य असल्याचे स्पष्टपणे लिहिले आहे. तसेच यात जास्त ‘कॅफिन’ आहे आणि ३४ टक्के साखरेचे प्रमाण आहे.

**■ ‘स्टिंग’च्या सेवनामुळे लहान मुलांवर काय दुष्परिणाम होतील?**

लहान मुलांनी याचे सेवन केल्यामुळे त्यांच्या हृदयाचे ठोके वाढतात. त्यामुळे उच्च रक्तदाब वाढण्याची शक्यता असते. ३४ टक्के साखर असलेले पेय घेतल्यास भविष्यात मधुमेहासारखे आजार होणार आहेत. ज्याप्रमाणे सरकारने लहान मुलांना तंबाखूविक्रीवर बंदी आणली, तसेच लहान मुलांच्या बाबतीत ‘स्टिंग’ या पेयावरील विक्रीस बंदी आणावी. असे निर्बंध घातले तर पुढच्या पिढीस याचा नक्कीच फायदा होईल.



**■ अशा पेयांच्या जाहिरातीबाबत काय सांगाल?**

जाहिरात हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारित येत नाही. तो ‘एफएसएसआय’च्या अंतर्गत येतो. पण, नक्कीच मी ‘एफएसएसआय’लासुद्धा पत्रव्यवहार करणार आहे.

**■ सरकारकडून काय आश्वासन मिळाले आहे?**

मला मिळालेले आश्वासन सकारात्मक आहे. शाळेपासून ५०० मीटरच्या परिसरात लहान मुलांना ‘स्टिंग’ची विक्री केली जाणार नाही. आता याची अंमलबजावणी किती होते, ते पाहणे गरजेचे आहे. शाळांच्या परिसरात विद्यार्थ्यांच्या आरोग्यास अपायकारक ठरणारे अन्नपदार्थ; तसेच कॅफिनयुक्त पेयांची विक्री आढळून आल्यास संबंधितांवर प्रचलित कायद्यानुसार कारवाई करण्यात येईल, अशी माहिती अन्न व औषध प्रशासनमंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधानसभेत दिली आहे.

**■ याबाबत जनजागृती कशी कराल?**

आपल्यासारखी वर्तमानपत्रे आणि माध्यमे हीच याबाबत सकारात्मक बदल आणू शकतात. कारण, आजही अनेक पालकांना आणि लहान मुलांना हे माहीत नाही की, ‘स्टिंग’ हे पेय त्यांच्यासाठी नाही. शिवाय, ‘स्टिंग’ हे पेय मद्यपेयाप्रमाणेच घातक आहे.

सविस्तर मुलाखत पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा
महा MTB www.mahamtb.com

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

E-TENDER 2nd CALL NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from registered contractors agencies on Mahatransco E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for following works

| Sr. No. | RFX No. | E-Tender No. & Description of Material | Due date & Time (Hrs.) for submission & Opening of Tender |
|---|---|---|---|
| 1 | 7000040358 | **SE/EHV/O&M/CIR/KLW/TECH/Ten-13 (2nd call)/26-27**<br>E-Tender for Work of Providing & fixing of Main Switch Fixed Contact assembly for 220 KV, 2000A, Double break Isolator with related hardware/Spares suitable for 220 KV side isolator of 400/220 KV Kudus S/s under 400KV RS O&M Division Kudus | **Tender Downloading Dates & time.**<br>**Tender Sale period:**<br>From Dt: 04.07.2026, 00:00 Hrs to Dt. 14.07.2026, 09:59 Hrs<br>**Technical Opening:** Dt. 14.07.2026 at 10: 00 Hrs (Onwards if possible)<br>**Commercial Opening:** Dt. 14.07.2026 at 15:00 Hrs (Onwards if possible) |
| | | **Tender Fee** | **Rs. 5000 + GST** |
| | | **Estimated Cost** | **Rs. 1,57,58,236.00/-** |

**Contact Person:** Executive Engineer / Dy. Exe. Engineer (O) Tel No. 7506379055

**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
SUPERINTENDING ENGINEER